ePaper

## पंकजा मुंडेंच्या विधान परिषदेच्या उमेदवारीला मनोज जरांगेंचा विरोध?



| वर्ष - 7 । अंक - 361 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 02 जूलै 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- धोनीने कौतुक करताच भारावला रोहित
- भारताचा आफ्रिकेवर दणदणीत विजय
- श्रीकांत शिंदेंचा काँग्रेसवर हल्लाबोल
- सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावं

## पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीचे 5 आमदार

# अमित गोरखे विधान परिषदेवर!

### शहरात विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपाची संघटनात्मक बांधणी

। पिंपरी । महाईन्यूज

**राज्यात विधान परिषदेसाठी भाजपने आपल्या पाच उमेदवारांची यादी जाहीर केली. यात पिंपरी चिंचवड मधून अमित गोरखे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. गोरखे यांनी पिंपरी विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली होती. त्यापूर्वीच त्यांना विधानसभेची लॉटरी लागली आहे. यामुळे आता गोरखे यांच्या रूपात पिंपरी चिंचवड शहराला पाचवा आमदार मिळणार आहे.**



भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी यासंदर्भात उमेदवारी जाहीर केली आहे. अमित गोरखे यांच्यासह माजी मंत्री पंकजा मुंडे, परिणय फुके, योगेश टिळेकर, सदाभाऊ खोत यांचीही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. जुलै महिन्यात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. २ जुलै उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

लोकसभा निवडणुकांचे निकाल लागताच राज्यात विधानपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. जुलै महिन्यात विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. 2 जुलै उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. त्यापार्श्वभूमीवर, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेसाठी काही नावांचा प्रस्ताव केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाकडे पाठवला आहे. त्यामध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष आणि भाजपचे पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांचा समावेश होता. केंद्रीय नेतृत्वाकडून गोरखे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

अमित गोरखे यांना संधी मिळाल्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद वाढणार असून पक्षाला आगामी निवडणुकीत फायदा होणार आहे. विधानसभेचे दोन आणि विधानपरिषदेचे दोन असे भाजपचे चार आमदार गोरखे यांच्या रूपाने होणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू अशी गोरखे यांची ओळख आहे.

### 'महाईन्यूज'चे वृत्त तंतोतंत खरे

पिंपरी : राज्यात विधानारिषदेसाठी भाजपाने आपल्या पाच उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या मध्ये पिंपरी-चिंचवडमधून अमित गोरखे यांच्या नावाचा समावेश आहे. त्यामुळे शहरात आता आमदारांची संख्या पाच होणार आहे. दरम्यान, याबाबत 'महाईन्यूज'ने "दोन दिवसांपूर्वी विधान परिषदेवर अमित गोरखे यांना संधी" या मथळ्याखाली वृत्त दिले होते. ते तंतोतंत खरे ठरले आहे.


महाईन्यूज

मोठी बातमी : पिंपरी-चिंचवडमधील भाजपाचे अमित गोरखे यांना विधान परिषदेवर संधी!

प्रदेश भाजपाकडून केंद्राकडे प्रस्ताव पाठवल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती

www.mahaenews.com

### पिंपरी चिंचवड शहरातील आमदार

१) आमदार अश्विनीताई जगताप – चिंचवड
२) आमदार अण्णा बनसोडे – पिंपरी
३) आमदार महेश लांडगे – भोसरी
४) विधान परिषद आमदार उमा खापरे
५) अमित गोरखे



## वर्षाविहाराच्या ठिकाणी दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करा

### खासदार बारणे यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व तहसीलदारांना पत्र

।चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वर्षाविहाराच्या वेळी होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. धोकादायक ठिकाणी पर्यटकांना प्रवेश बंदी करावी, अशी सूचना मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे.**

खासदार बारणे यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक व मावळचे तहसीलदार यांना या संदर्भात पत्र दिले आहे. भुशी धरणाच्या मागील बाजूस असलेल्या धबधब्यात एकाच कुटुंबातील



पाचजण वाहून जाण्याची दुर्घटना मन हेलावणारी आहे. अशा पद्धतीच्या दुर्घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने तातडीने काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे बारणे यांनी पत्रात म्हटले आहे.

पर्यटकांची गर्दी होत असलेल्या ठिकाणी दिशादर्शक फलक तसेच सुरक्षा विषयक सूचनांचे फलक लावण्यात यावेत. अतिउत्साही पर्यटकांना नियंत्रित करण्यासाठी आवश्यक तेवढे अतिरिक्त पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. धोकादायक ठिकाणी पर्यटकांसाठी प्रवेश बंदी लागू करण्यात यावी. पर्यटकांची गर्दी असलेल्या ठिकाणी पावसाळ्यात जीवरक्षकांची नेमणूक करण्यात यावी. त्यामुळे दुर्घटनेच्या वेळी पर्यटकांना तातडीने मदत मिळू शकेल, अशा सूचना बारणे यांनी केले आहेत.

> **"नागरिकहो, आपलं जीवन अमूल्य आहे. आपल्या कुटुंबासोबत आपण निसर्गाच्या सानिध्यात आनंद घेण्यासाठी जातो. पण, सुरक्षेची काळजी न घेतल्यामुळे आयुष्य उद्ध्वस्त होते. वर्षाविहारासाठी जाणारी तरुणाई आणि नागरिकांनी सुरक्षेची काळजी घ्यावी. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा प्रत्येक ठिकाणी उपलब्ध असतेच असे नाही. आपले कुटुंब आणि स्वत:ला जपावे, अशी कळकळीची विनंती करतो.**
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# विक्रमी संख्येसह मेट्रो सुसाट!

## पालख्यांच्या आगमनामुळे प्रवासी संख्या दुपटीने वाढून 2 लाखांवर पोहोचली

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे आगमन रविवारी पुण्यात झाले. यासाठी पुण्यासह पिंपरी-चिंचवडमधील अनेक मुख्य रस्ते वाहतूक पोलिसांनी बंद केले होते. यामुळे पुणेकरांनी मेट्रोने प्रवास करण्यास पसंती दिली. मेट्रोची प्रवासी संख्या रविवारी एकाच दिवसात दुपटीने वाढून दोन लाखांपर्यंत पोहोचली.**



सध्या मेट्रोची सेवा वनाझ ते रामवाडी आणि जिल्हा न्यायालय ते पिंपरी-चिंचवड महापालिका या दोन मार्गांवर सुरू आहे. पालख्यांच्या आगमनामुळे दोन्ही शहरांतील अनेक मुख्य रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. यामुळे प्रवास करण्यासाठी खासगी वाहनांचा पर्याय बंद झाल्याने नागरिकांनी मेट्रोला पसंती दिली. जून महिन्यात मेट्रोने दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची संख्या सरासरी १ लाख होती. मात्र, ३० जूनला ती दुपटीने वाढून १ लाख ९९ हजार ४३७ वर पोहोचली. त्यात पिंपरी-चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय मार्गावरील ८३ हजार ४२६ आणि वनाझ ते रामवाडी मार्गावरील १ लाख १६ हजार ११ प्रवाशांचा समावेश आहे. याच वेळी मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न रविवारी १५ लाख रुपयांवरून वाढून २४ लाख रुपयांवर पोहोचले.महामेट्रोने पालखीच्या आगमनानिमित्त प्रवासी संख्या वाढण्याची शक्यता असल्याने आधीपासूनच नियोजन केले होते. मेट्रोची सेवा पहाटे ६ ते रात्री १० या वेळेत सुरू असते. पालखी आगमनामुळे ही सेवा एक तासाने वाढवून रात्री ११ पर्यंत सुरू ठेवण्यात आली. प्रवाशांनी मेट्रो सेवेला मोठा प्रतिसाद दिला. पिंपरी-चिंचवड महापालिका स्थानकात सर्वाधिक १९ हजार ९१९ प्रवासी संख्येची नोंद झाली. त्या खालोखाल पुणे महापालिका स्थानक १८ हजार ७९, शिवाजीनगर स्थानक १७ हजार ४६, पुणे रेल्वे स्थानक १५ हजार ३७८ आणि रामवाडी स्थानकातून १४ हजार ७७० प्रवाशांनी प्रवास केला. जिल्हा न्यायालय स्थानकात ५१ हजार प्रवाशांनी त्यांची मार्गिका बदलली.

### नागरिकांनी मेट्रोला पसंती दिली

सध्या मेट्रोची सेवा वनाझ ते रामवाडी आणि जिल्हा न्यायालय ते पिंपरी-चिंचवड महापालिका या दोन मार्गांवर सुरू आहे. पालख्यांच्या आगमनामुळे दोन्ही शहरांतील अनेक मुख्य रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. यामुळे प्रवास करण्यासाठी खासगी वाहनांचा पर्याय बंद झाल्याने नागरिकांनी मेट्रोला पसंती दिली. जून महिन्यात मेट्रोने दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची संख्या सरासरी १ लाख होती.

# राज्यात जुलैमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस

## यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोसमी पावसासाठी पोषक वातावरण आहे. पुढील तीन दिवसांत देशाच्या उर्वरित भागात मोसमी पाऊस दाखल होईल. जुलै महिन्यात राज्यासह देशभरात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.**



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरातील एल-निनो तटस्थ अवस्थेत गेला आहे, तर ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांत ला – निना स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. तर हिंदी महासागरातील द्वि धुव्रिता सध्या तटस्थ आहे. मोसमी पावसासाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे जुलै महिन्यात देशभरात सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. जुलै महिन्यात देशात सरासरी २८०.४ तर राज्यात सरासरी ३६२.३ मिमी पाऊस पडतो, यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे.राज्यात कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्रात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. त्या तुलनेत उत्तर महाराष्ट्रात काहीसा कमी पण, सरासरी इतका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जुलै महिन्यांत देशासह राज्यात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. राजस्थान आणि पंजाबचा वायव्य भाग वगळता सोमवारपर्यंत (१ जुलै) मोसमी पावसाने देशाचा सर्व भाग व्यापला आहे. पुढील तीन दिवसांत देशाच्या उर्वरीत भागात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात पुढील दोन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे.जून महिन्यात दक्षिण भारताचा अपवाद वगळता देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. जूनमध्ये देशात सरासरी १६५.३ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात १०.९ टक्के कमी म्हणजे १४७.२ मिमी पाऊस झाला. दक्षिण भारतात सरासरी १६१ मिमी पाऊस पडतो, तिथे १४.२ टक्के अधिक, १८३.९ मिमी पाऊस झाला आहे. वायव्य भारतात सरासरी ७८.१ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ३२.६ टक्के कमी, ५२.६ मिमी पाऊस झाला. ईशान्य भारतात ३२८.४ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात १३.३ टक्के कमी, २८४.९ मिमी पाऊस पडला. मध्य भारतात १७०.३ मिमी सरासरी पाऊस पडतो, प्रत्यक्षात १३.७ टक्के कमी, १४७ मिमी पाऊस पडला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरातील एल-निनो तटस्थ अवस्थेत गेला आहे, तर ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांत ला – निना स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. तर हिंदी महासागरातील द्वि धुव्रिता सध्या तटस्थ आहे.

### 147.2 मिमी पाऊस झाला

मोसमी पावसासाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे जुलै महिन्यात देशभरात सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. जुलै महिन्यात देशात सरासरी २८०.४ तर राज्यात सरासरी ३६२.३ मिमी पाऊस पडतो, यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे.राज्यात कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्रात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. त्या तुलनेत उत्तर महाराष्ट्रात काहीसा कमी पण, सरासरी इतका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जुलै महिन्यांत देशासह राज्यात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. राजस्थान आणि पंजाबचा वायव्य भाग वगळता सोमवारपर्यंत (१ जुलै) मोसमी पावसाने देशाचा सर्व भाग व्यापला आहे. पुढील तीन दिवसांत देशाच्या उर्वरीत भागात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात पुढील दोन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. जून महिन्यात दक्षिण भारताचा अपवाद वगळता देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. जूनमध्ये देशात सरासरी १६५.३ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात १०.९ टक्के कमी म्हणजे १४७.२ मिमी पाऊस झाला.


## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे 'पीएमआरडीए' आयुक्तांना आदेश

# भारतातील पहिल्या 'संविधान भवन'च्या उभारणीला चालना!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेल्या भारतीय संविधानासह अन्य देशाच्या संविधानांचा अभ्यास सर्वसामान्य नागरिकांना करता यावा. या करिता पिंपरी-चिंचवडमध्ये पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (PMRDA) "संविधान भवन" प्रस्तावित केले आहे. संविधान साक्षरता या हेतुने हाती घेतलेल्या या कामाला गती द्यावी, असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.**





मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री शिंदे यांची मंत्रालयात भाजपा आमदार महेश लांडगे यांनी भेट घेतली. यावेळी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रस्तावित "संविधान भवन"बाबत सकारात्मक चर्चा केली. तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये सदर संविधान भवन व विपश्यना केंद्र प्रस्तावित असून, प्राधिकरणाच्या सभा क्र. ३३७ दि. २२ जानेवारी २०१९ च्या विषय क्रमांक ४ अन्वये ठराव मंजुर केला आहे. त्यानुसार, पेठ क्रमांक ११ मेध्ये "संविधान भवन व विपश्यना केंद्र " उभारणीसाठी मान्यता दिली आहे. सदर दोन्ही प्रकल्प स्वतंत्रपणे विकसित करण्याची आवश्यकता आहे. प्रकल्प सल्लागार नियुक्ती व तज्ञ समितीची नेमणूक करण्यासह प्राधिकरण सभेची मान्यता मिळाली आहे. आता २०२१ मध्ये नवनगर प्राधिकरणाचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) मध्ये विलिनीकरण झाले आहे. PMRDA चा वाढलेला व्याप पाहता संविधान भवन उभारण्याच विलंब अथवा असमर्थता असेल, तर सदर आरक्षीत जागा पिंपरी-चिंचवड महापालिका हस्तांतरीत करावी, अशी आग्रही मागणी आमदार लांडगे यांनी केली.

यावर सकारात्मक भूमिका घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांना संविधान भवन उभारणीसाठी पीएमआरडीए आणि पीसीएमसी यांनी एकत्रितपणे तातडीने कार्यवाही सुरू करावी, असे आदेश दिले आहे. महाराष्ट्रातील नव्हे, तर संपर्ण देशातील हे पहिलेच संविधान भवन ठरणार आहे.

> **"जगातील लोकशाही देशांच्या घटनांचा अभ्यास करता यावा. तसेच, भारतीय संविधानाची जागृती व्हावी. त्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये "संविधान भवन" सारखी आंतरराष्ट्रीय दर्जाची वास्तू उभारणीच्या कामाला गती द्यावी. यासाठी मुख्यमंत्री महोदय यांची भेट घेतली. त्यांनी संबंधित पीएमआरडीएच्या आयुक्तांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता-स्वातंत्र्य आणि लोकशाही विचारांचे जनत करणारे भारतातील पहिले संविधान भवन साकारले जात आहे. याचा अभिमान वाटतो. जगातील विविध राज्य घटनांचा अभ्यास करणारे अभ्यासक यानिमित्ताने शहरात येतील, ही निश्चितच महत्त्वपूर्ण बाब आहे.**
>
> **– महेश लांडगे,**
> **आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

## 'पीएमआरडीए'च्या सदनिकांच्या अनामत रक्कमेत घट

### प्रतिसाद वाढविण्यासाठी बदल; सेक्टर 12, 30, 32 गृहप्रकल्पांचा सोडतीला मुहूर्त

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) गृहप्रकल्पाच्या अनामत रक्कम कमी करण्यात आली आहे. सेक्टर १२, ३० आणि ३२ या ठिकाणच्या सदनिकांसाठी त्यामुळे मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. लवकरच येथील सदनिकांसाठी सोडत काढली जाणार आहे. येत्या महिनाभरात त्याची प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.




पीएमआरडीएने इंद्रायणीनगर, भोसरी आणि वाल्हेकरवाडी येथे गृहप्रकल्प उभारला आहे. सेक्टर १२ आणि ३० आणि ३२ या दोन्ही ठिकाणी जवळपास बाराशेहून अधिक सदनिका वाटपाअभावी शिल्लक आहेत. यापूर्वी एकदा सोडत काढण्यात आली होती. यामध्ये अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने सदनिका शिल्लक राहिल्या आहेत. अनेकांनी वेळेत पैसे भरून कागदपत्रांची पूर्तता न केली नाही. त्यामुळे सदनिकांचा ताबा देता आला नाही. चिंचवड वाल्हेकरवाडी येथील ३० आणि ३२ या ठिकाणी यापूर्वी काढण्यात आलेल्या लॉटरीमध्ये १९२ सदनिकाधारकांची निवड करण्यात आली होती. विलंब शुल्क, मुद्रांक शुल्क यासह अनामत रक्कम भरलेले मात्र, उर्वरित रक्कम न भरलेल्या धारकांना ताबा मिळू शकला नाही. त्यामुळे मोठी संख्या घटली होती. या घरांसाठी दुसरी सोडत काढण्यात येणार आहे. सेक्टर १२ या ठिकाणी गृहप्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात चार हजार ८८३ घरे उभारण्यात आली. त्यापैकी अनेक घरे रिकामी राहिल्याने नव्याने सोडत काढली जाणार आहे. यातून देखील घरे शिल्लक राहिल्यास ती सर्वांसाठी खुली असून, पहिले येतील त्यास घरे देण्यात येणार आहे.

> **"पीएमआरडीएच्या सदनिकांच्या वाटपासाठी या महिन्यातच लॉटरी काढण्यात येणार आहे. त्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. सध्या सदनिकांसाठी लागणारी अनामत रक्कम देखील कमी करण्यात येणार आहे. त्याची कार्यवाही लवकरच केली जाईल.**
>
> **– हिंमत खराडे, उपजिल्हाधिकारी, पीएमआरडीए.** चिंचवड.

दरम्यान, या घरांना नागरिकांचा जास्तीत जास्त प्रतिसाद मिळावा आणि रिकाम्या घरांची विक्री लवकर व्हावी, यासाठी पीएमआरडीएच्या जमीन व मालमत्ता विभागाच्या वतीने काही बदल करण्यात येणार आहे. त्यात महत्त्वाचे म्हणजे यापूर्वी आकारण्यात येणारी अनामत रक्कम कमी केली जाणार आहे. सदनिका सोडत अर्ज भरताना सदनिकेच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम ही भरावी लागत होती. त्यामुळे ती रक्कम जवळपास लाखांच्या घरात जात होती. एवढी रक्कम एकाच वेळी भरणे अर्जदारांना शक्य होत नव्हते.

परिणाम, सोडतीसाठी अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. यासाठी त्याला रकमेमध्ये घट केली जाणार असून, दहा हजार रुपये अनामत रक्कम असल्याचे सांगण्यात आले.

# नालंदा विद्यापीठा'कडून मोठ्या अपेक्षा



## भूमिका

**इसवी सनाच्या पाचव्या शतकात स्थापन झालेले 'नालंदा विद्यापीठ' हे जगातील सर्वात प्राचीन निवासी विद्यापीठांपैकी एक... गुप्त साम्राज्याच्या संरक्षणाखाली स्थापन झालेल्या या विद्यापीठाने चीन, कोरिया, जपान, तिबेट, मंगोलिया आणि मध्य आशियासह संपूर्ण आशियातील विद्वानांना आकर्षित केले.**

तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र आणि वैद्यक यांसारख्या विविध क्षेत्रात शिक्षण देत विद्यापीठाने शतकानुशतके भरभराट केली. तथापि, बाराव्या शतकात तुर्क-अफगाण आक्रमणांमुळे या विद्यापीठाला अधोगती आणि विनाशाचा सामना करावा लागला. या विद्यापीठाच्या अर्वाचीनीकरणाची कल्पना पहिल्यांदा मांडली गेली ती मार्च २००६ मध्ये बिहार विधानसभेच्या ठरावाद्वारे. याचा पाठपुरावा तत्कालीन राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी केला आणि आंतरराष्ट्रीय सहमतीही मिळू लागली. संसदेने २०१० मध्ये नालंदा विद्यापीठ पुनर्स्थापनेचे विधेयक मंजूर केले, पण विद्यार्थ्यांची पहिली तुकडी येथे येण्यास सप्टेंबर २०१४ उजाडला. मग जून २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसचे उद्घाटन केले हा त्याच्या पुनरुज्जीवनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून ओळखला जाईल. हा महत्त्वाचा प्रसंग एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण करतो : नालंदा विद्यापीठ हे 'ग्लोबल ईस्ट'चे विद्यापीठ म्हणून उदयास येऊ शकते का? ते भारताचे हार्वर्ड, स्टॅनफोर्ड किंवा पेनसिल्व्हेनिया होऊ शकते का?नालंदा विद्यापीठाचे पुनरुज्जीवन हे केवळ प्राचीन वैभवाची पुनर्स्थापना नसून भारताला खऱ्या अर्थाने जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून स्थान देण्याचे धोरणात्मक पाऊल असले पाहिजे. ही दृष्टी साध्य करण्यासाठी नालंदा विद्यापीठाने विचार केला पाहिजे असे काही महत्त्वाचे घटक माझ्या मते असे आहेत : (१) नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी: देशातील 'आयआयटी' आणि 'आयआयएम'ची संख्या वाढत असताना, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० ची पूर्ण अंमलबजावणी करण्यासोबतच जागतिक विद्यापीठ म्हणून नालंदाचा दर्जा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. नालंदाला या धोरणातील सुधारणांचे एकत्रीकरण करून, नाविन्यपूर्णतेला चालना देऊन आणि विद्यार्थ्यांना जागतिक आव्हानांसाठी तयार करणाऱ्या सर्वांगीण शिक्षणाचा प्रचार करून इतर विद्यापीठांसाठी एक उदाहरण सिद्ध करण्याची संधी आहे.(२) स्वायत्तता आणि शासन : नालंदा विद्यापीठाची भरभराट होण्यासाठी त्याला पूर्ण स्वायत्तता दिली जावी. हे संस्थेला नोकरशाहीच्या बंधनांपासून मुक्तपणे प्रशासन, अभ्यासक्रम आणि सहयोगांबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यास अनुमती देईल. (३) आर्थिक सहाय्य : निधीची कमतरता पडणार नाही याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. या विद्यापीठाची स्वायत्तता कायम राखून सरकारने पायाभूत सुविधांचा विकास, संशोधन सुविधा आणि शिष्यवृत्तीसाठी भरीव आर्थिक पाठबळ दिले पाहिजे. (४) जागतिक दर्जाचे अध्यापक : विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी प्रतिष्ठित प्राध्यापक सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. बौद्धिकदृष्ट्या समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि अनुभवी प्राध्यापक हे जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थेचे आधारस्तंभ असतात. सर्वसमावेशक आणि लवचिक शिक्षण अनुभव सुनिश्चित करून, ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतींद्वारे, विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रातील सर्वोत्तम चिंतकांकडून शिकण्याची संधी मिळावी. (५) जागतिक वास्तवाशी संबंध : नालंदा युनिव्हर्सिटीने व्यावहारिक ज्ञान आणि इंडस्ट्री एक्सपोजर एकत्रित करणाऱ्या अभ्यासक्रमाद्वारे वास्तविक-जागतिक शिक्षणावर (रिअल-वर्ल्ड लर्निंग) भर दिला पाहिजे. हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना जागतिक आव्हानांसाठी तयार करेल, त्यांना विविध व्यावसायिक संदर्भांमध्ये थेट लागू होणाऱ्या कौशल्यांनी सुसज्ज करेल. ६) संशोधन आणि नवोपक्रम : अत्याधुनिक संशोधनाला प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक दोघेही जागतिक दर्जाच्या संशोधनात सहभागी होऊ शकतील अशा वातावरणाला प्रोत्साहन देऊन, नालंदाने जागतिक आव्हानांना तोंड देणारे महत्त्वपूर्ण कार्य केले पाहिजे. (७) दर्जेदार पीएच.डी. : विद्यापीठाच्या प्रतिष्ठेसाठी उच्च दर्जाचे पीएच.डी. पदवीधर तयार करणे आवश्यक आहे. यासाठी कठोर शैक्षणिक मानके, सर्वसमावेशक मार्गदर्शन कार्यक्रम आणि विस्तृत संशोधन संसाधनांमध्ये प्रवेश आवश्यक आहे.(८) जागतिक मान्यता आणि उद्योग स्वीकृती : नालंदा विद्यापीठातील पदवीधरांना जागतिक दर्जाची मान्यता मिळायला हवी!




## प्रासंगिक »

### फ्रँक डकवर्थ

***इंग्लिश क्रिकेटमध्ये पावसाचा व्यत्यय अनेकदा येतो. त्यामुळे १९८०च्या दशकातच डकवर्थ यांनी या विषयात आकडेमोड सुरू केली होती.***

क्रिकेट विश्वचषक १९९२मध्ये दक्षिण आफ्रिका विरुद्ध इंग्लंड या उपान्त्य फेरीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेस विजयासाठी १२ चेंडूंमध्ये २२ धावा हे समीकरण पावसाच्या व्यत्ययानंतर १ चेंडूमध्ये २२ धावा असे एकाच वेळी हास्यास्पद आणि क्रूर बनले. अर्थातच दक्षिण आफ्रिकेने तो सामना गमावला. पण या निमित्ताने मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये पावसाच्या व्यत्ययानंतर सुधारित लक्ष्य निर्धारणासाठी प्रमाणित गणिती पद्धतीच्या अभावाचा मुद्दा अधोरेखित झाला. ती स्पर्धा झाली ऑस्ट्रेलियात. त्याच वर्षी इंग्लंडमधील शेफील्ड येथे रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीची एक परिषद झाली. तीत 'खराब हवामानात समन्यायी निकाल' या बिरुदाखाली एक लघु टिपण सादर झाले. त्या टिपणाचे लेखक होते फ्रँक डकवर्थ.इंग्लिश क्रिकेटमध्ये पावसाचा व्यत्यय अनेकदा येतो. त्यामुळे १९८०च्या दशकातच डकवर्थ यांनी या विषयात आकडेमोड सुरू केली होती.

चरस, गांजा, कोकेन या सारख्या अमलीपदार्थांची जागा आता रासायनिक अमलीपदार्थ व प्रतिबंधित गोळ्यांनी घेतली आहे. विशेषत: मेफेड्रोनचा (एमडी) वापर सर्वाधिक केला जातो. मुंबई पोलिसांनी दोन वर्षांत पाच हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे एमडी जप्त केले आहे

# सर्वाधिक केला जातो फेड्रोनचा (एमडी) वापर

. त्यापूर्वी २०१८ मध्ये मुंबई पोलिसांनी १० कोटी रुपयांचे एमडी जप्त केले होते. २०१९ मध्ये तीन कोटी, २०२० मध्ये पाच कोटी २१ लाख, २०२१ मध्ये ३२ कोटी २९ लाख रुपये किमतीचा एमडी जप्त केले होते. अल्पवयीन मुले, मध्यमवर्गीय व्यक्ती असे अनेक जण एमडीच्या व्यसनाच्या गर्तेत अडकले आहेत.कोकेन हा पदार्थ सर्वात महागडा असून उच्चभ्रू पार्ट्यांमध्ये आजही मोठ्या प्रमाणत कोकेनचे सेवन केले जाते. कोकेन तस्करीत दक्षिण अमेरिकेतील टोळ्या मोठ्या प्रमाणात सक्रिय आहेत. कोकेनच्या तस्करीसाठी पूर्वी आफ्रिका खंडातील गरीब देशांमध्ये नागरिकांचा वापर व्हायचा. पण सध्या दक्षिण अमेरिकेतील बोलिव्हिया, व्हेनेझुएला, गयाना, ब्राझील, कोलंबिया आणि सुरीनाम या देशांतील गरीब नागरिकांचाही कोकेनच्या तस्करीसाठी वापर होतो. कोकेनच्या तस्करीसाठी अदीस अबाबा ते दुबई व मग दुबई ते मुंबई हा हवाई मार्ग कुख्यात आहे. याच मार्गाचा वापर करून भारतात कोकेन



येते. बनावट कोकेनही विकले जाते. त्याला चायना व्हाइट असा सांकेतिक शब्द आहे. कोकेनला मुख्यत: ओजी व्हाइट किंवा व्हाइट आइस म्हटले जाते. या सांकेतिक नावांत स्थळ-काळानुसार बदल होतो. पूर्वी ड्रग्ससाठी चित्रपट अभिनेत्रींच्या नावांचा वापर केला जायचा.हेरॉइन हे अफूपासून तयार केले जाते. ते मानवनिर्मितही असते. अफगाणिस्तानातून देशात हेरॉइनचा साठा येतो. पण त्यात आता घट झाली आहे. हेरॉइन पाकिस्तान, आखाती देशांच्या मार्गे येत असल्यामुळे समुद्र अथवा विमान मार्गे मुंबई व पश्चिमेकडील किनारपट्टी भागात उतरवले जाते. राजस्थानातूनही राज्यात हेरॉइनची तस्करी होते.रासायनिक अमली पदार्थांपैकी केटामाईन व एम्फेटामाईन यांची निर्मिती भारतीय तस्कर करत आहेत. उत्तरेकडील राज्यांमध्ये केटामाईन तर दक्षिणेकडे एम्फेटामाईनची निर्मिती होते. केटामाईन कॅनडा व अमेरिकेत पाठवले जाते. त्यात प्रतिबंधित संघटनांचा सहभाग आहे. दुसरीकडे एम्फेटामाईनची ऑस्ट्रेलिया व न्यूझिलंडसारख्या देशांमध्ये तस्करी केली जाते. भारतात या पदार्थांना फारशी मागणी नाही.फार वर्षांपासून राज्यामध्ये चरसची तस्करी होत आहे. काश्मिरी आणि डेहरादुनी असे दोन प्रकारचे चरस उपलब्ध असते. काश्मिरी चरस उच्च प्रतीचे असून त्याला जास्त मागणी आहे. त्यातही दोन प्रती आहेत. एकाला काला पत्थर आणि दुसऱ्याला काला साबण म्हणतात. डेहरादूनमधून येणाऱ्या चरसला रबडी असा सांकेतिक शब्द आहे. पण गेल्या काही वर्षांत चरसच्या तस्करीत कमालीची घट झालेली दिसत आहे. एमडीमुळे चरसच्या सेवनात घट झाल्याचे अधिकारी, यातील जाणकार सांगतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कपटी लोकांनी आम्हाला छळलं!

## शिंदेंच्या नेत्याची भाजपाच्या माजी केंद्रीय मंत्र्यावर टीका?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ज्या कपटी लोकांनी तुम्हा-आम्हाला छळलं, त्रास दिला त्यांचा निवडणुकीत सत्यानाश झाला", असं वक्तव्य शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते आणि माजी आमदार अर्जुन खोतकर यांनी केलं आहे. खोतकर यांनी कोणत्याही व्यक्तीचं अथवा नेत्याचं नाव घेतलेलं नसलं तरी त्यांचा रोख त्यांचे जालन्यातील राजकीय प्रतिस्पर्धी रावसाहेब दानवे यांच्याकडे होता असं बोललं जात आहे.**



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालन्यात शिवसेनेच्या शिंदे गटाची एक आढावा बैठक पार पडली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिंदे गट जालन्यात तयारी करत आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी ही बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला संबोधित करताना अर्जुन खोतकर यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तसेच या वक्तव्यामुळे जालन्यातील शिवसेना भाजपातील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असल्याची चर्चा आहे. शिवसेना आणि भाजपाची तीन दशकांहून अधिक काळापासून युती असली तर जालन्यात दोन्ही पक्षांमध्ये अधून मधून संघर्ष झाल्याचं पाहायला मिळालं आहे. अर्जुन खोतकर आणि रावसाहेब दानवे यांच्यातील संघर्ष सर्वश्रुत आहे. या दोघांमधील वाद मिटून दोन्ही नेत्यांनी युतीसाठी एकत्र राहून काम करावं यासाठी अनेकदा दोन्ही पक्षांमधील वरिष्ठांना मध्यस्थी करावी लागली आहे. दरम्यान, खोतकर यांनी नुकतीच नाव न घेता एका नेत्यावर टीका केली आहे. त्यामुळे खोतकरांचा रोख रावसाहेब दानवेंकडेच होता असं बोललं जात आहे.पक्षाच्या आढावा बैठकीत अर्जुन खोतकर म्हणाले, "ज्या कपटी लोकांनी तुम्हा आम्हाला छळलं, ज्यांनी तुम्हा-आम्हाला फार त्रास दिला, त्यांचा निवडणुकीत सत्यानाश झाला. मात्र आता त्यांच्यापासून सावध राहायची आवश्यकता आहे. त्यांच्यापासून सावधपणे पावलं टाकण्याची वेळ आली आहे." नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जालना मतदारसंघात रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला आहे. खोतकरांनी त्याच घटनेचा उल्लेख करत हे वक्तव्य केलं असावं, असं बोललं जात आहे. जालना लोकसभा मतदारसंघात महायुतीचे (भाजपा) उमेदवार रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला आहे. सलग पाच वेळा जालन्याचे खासदार राहिलेले दानवे यंदा विजयी षटकार ठोकू शकले नाहीत. काँग्रेसचे उमेदवार कल्याण काळे (महाविकास आघाडी) यांनी जालन्यात रावसाहेब दानवे यांचा तब्बल १ लाख १० हजार मतांनी पराभव केला आहे. कल्याण काळे यांना या निवडणुकीत ६ लाख ७ हजार मतं मिळाली तर दानवे यांना ४ लाख ९७ हजार मतांवर समाधान मानावं लागलं.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालन्यात शिवसेनेच्या शिंदे गटाची एक आढावा बैठक पार पडली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिंदे गट जालन्यात तयारी करत आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी ही बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला संबोधित करताना अर्जुन खोतकर यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तसेच या वक्तव्यामुळे जालन्यातील शिवसेना भाजपातील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असल्याची चर्चा आहे. शिवसेना आणि भाजपाची तीन दशकांहून अधिक काळापासून युती असली तर जालन्यात दोन्ही पक्षांमध्ये अधून मधून संघर्ष झाल्याचं पाहायला मिळालं आहे. अर्जुन खोतकर आणि रावसाहेब दानवे यांच्यातील संघर्ष सर्वश्रुत आहे.

### 1 लाख 10 हजार मतांनी पराभव

या दोघांमधील वाद मिटून दोन्ही नेत्यांनी युतीसाठी एकत्र राहून काम करावं यासाठी अनेकदा दोन्ही पक्षांमधील वरिष्ठांना मध्यस्थी करावी लागली आहे. दरम्यान, खोतकर यांनी नुकतीच नाव न घेता एका नेत्यावर टीका केली आहे. त्यामुळे खोतकरांचा रोख रावसाहेब दानवेंकडेच होता असं बोललं जात आहे.पक्षाच्या आढावा बैठकीत अर्जुन खोतकर म्हणाले, "ज्या कपटी लोकांनी तुम्हा आम्हाला छळलं, ज्यांनी तुम्हा-आम्हाला फार त्रास दिला, त्यांचा निवडणुकीत सत्यानाश झाला. मात्र आता त्यांच्यापासून सावध राहायची आवश्यकता आहे. त्यांच्यापासून सावधपणे पावलं टाकण्याची वेळ आली आहे." नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जालना मतदारसंघात रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला आहे. खोतकरांनी त्याच घटनेचा उल्लेख करत हे वक्तव्य केलं असावं, असं बोललं जात आहे. जालना लोकसभा मतदारसंघात महायुतीचे (भाजपा) उमेदवार रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला आहे. सलग पाच वेळा जालन्याचे खासदार राहिलेले दानवे यंदा विजयी षटकार ठोकू शकले नाहीत. काँग्रेसचे उमेदवार कल्याण काळे (महाविकास आघाडी) यांनी जालन्यात रावसाहेब दानवे यांचा तब्बल १ लाख १० हजार मतांनी पराभव केला आहे.

# ठाकरे गटाच्या 'त्या' पत्राला केराची टोपली?

## काँग्रेसकडून प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेची उमेदवारी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक घेतली जाणार आहे. येत्या १२ जुलै रोजी या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडेल.**

दरम्यान, या निवडणुकीसाठी भाजपाने त्यांचे पाच उमेदवार जाहीर केले आहेत. पाठोपाठ काँग्रेसनेही त्यांचा एक उमेदवार जाहीर केला आहे.काँग्रेसने दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेची उमेदवारी दिली आहे. काँग्रेसने परिपत्रक काढून याबाबतची माहिती दिली आहे. परिपत्रकात म्हटलं आहे की विधानसभा सदस्यांद्वारे निवडल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या विधान परिषदेची द्विवार्षिक निवडणूक लढवण्यासाठी डॉ. प्रज्ञा सातव यांच्या उमेदवारीच्या प्रस्तावास पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मंजुरी दिली आहे.काँग्रेस नेते राजीव सातव यांच्या निधनानंतर काँग्रेसने त्यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेवर पाठवलं



होतं. त्यांचा सदस्यत्वाचा कार्यकाळ आता संपणार असून पक्षाने पुन्हा एकदा त्यांना उमेदवारी दिली आहे. याआधी सोनिया गांधी यांनी प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेवर जाण्याची संधी दिली होती. यावेळी पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीदेखील सातव यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं आहे. हिंगोली लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस आमदार प्रज्ञा सातव यांनी आघाडीचा (महाविकास आघाडी) धर्म पाळला नाही. त्यांनी पक्षाने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत कार्यकर्ते आणि मतदारांना संभ्रमित केलं होतं अशी लेखी तक्रार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनिर्वाचित खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी काँग्रेसचे सचिव के. सी. वेणुगोपाल यांच्याकडे केली होती. हिंगोली लोकसभा मतदारसंघात कळमनुरी विधानसभा मतदारसंघात प्रज्ञा सावत यांचं राजकीय वलय आहे. मात्र त्यांनी लोकसभेला आपल्याला मदत केली नाही.

### खोत यांना देखील उमेदवारी

प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेवर पाठवण्याची तयारी केली आहे.दुसऱ्या बाजूला भाजपाने पाच जागांवर त्यांचे उमेदवार जाहीर केले आहेत. सध्या महाराष्ट्रात चालू असलेल्या मराठा-ओबीसी आरक्षण वादाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील ओबीसी नेत्या पंकजा मुंडे यांना भाजपाने विधान परिषदेवर पाठवण्याची योजना आखली आहे. मुंडे यांच्यासह योगेश टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे आणि सदाभाऊ खोत यांना देखील पक्षाने उमेदवारी दिली आहे.

# श्रीकांत शिंदेंचा काँग्रेसवर हल्लाबोल!

## जननतेने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींवर विश्वास दाखवला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसने एकट्याने निवडणूक लढवली किंवा आघाडी म्हणून लढवली, तरी काँग्रेसला शेवटी विरोधातच बसायचं आहे, असं म्हणत खासदार श्रीकांत शिंदे यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. श्रीकांत शिंदे यांनी आज १८व्या लोकसभेतील पहिलं भाषण केलं. यावेळी त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. महत्त्वाचे म्हणजे त्यांनी भाषणाची सुरुवात पांडुरंगाच्या जयघोषणाने केली. तसेच त्यांनी तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आल्याबद्दल कल्याणमधील जनतेचे आभारही मानले.**



“मी देशातील आणि राज्यातील जनतेचे आभार मानतो, त्यांनी पंतप्रधान मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवले. तसेच मी कल्याणमधील जनतेचेही आभार मानतो, की त्यांनी मला तिसऱ्यांदा मला लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून दिले. मी एनडीए सरकारला तिसऱ्या कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो. मागच्या १० वर्षात एनडीए सरकारने जी विकासाची कामं केली आहेत, ती पुढचे पाच वर्ष सुरु राहतील, असा मला विश्वास आहे”, अशी प्रतिक्रिया श्रीकांत शिंदे यांनी दिली.पुढे बोलताना त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीकाही केली. “काँग्रेसने एकट्याने निवडणूक लढवली किंवा आघाडी म्हणून लढवली, तरी काँग्रेसला शेवटी विरोधातच बसायचं आहे. आज काँग्रेस विरोधी पक्षात आहे, मात्र, त्यांना सत्तेत असल्याचा सारखा आनंद होतो आहे. गेल्या १० वर्षात काँग्रेस ४४ जागांवरून केवळ ९९ जागांवर पोहोचली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला १०० च्या संख्येपर्यंतही पोहचता आलेलं नाही”, असे ते म्हणाले. “काँग्रेसने २८५ जागांवर निवडणूक लढवली. मात्र, केवळ ९९ जागांवर त्यांना विजय मिळवता आला. या निवडणुकीत काँग्रेसच्या ५१ उमेदवारांची जमानत जप्त झाली. आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश या राज्यांत काँग्रेसला खातेही उघडता आलेले नाही. त्यामुळे काँग्रेसने आता आत्मचिंतन करण्याची आवश्यता आहे”, असा टोलाही त्यांनी लगावला.“देशातील जनतेने तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनवले आहे. २०२४-२५ मध्ये ८० देशांमध्ये निवडणुका आहेत. त्यापैकी ५० देशांतील निवडणुका झाल्या आहेत. त्यातही ३४ देशांमध्ये सरकार बदलले आहे. मात्र, भारतातील जननतेने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींवर विश्वास दाखवला आहे. कारण पंतप्रधान मोदी यांनी आंतराष्ट्रीय स्तरावर भारताचं नाव उंचावलं आहे. भारत आज आत्मनिर्भरतकडे वाटचाल करतो आहे ”, असेही ते म्हणाले. तसेच “काँग्रेसच्या धोरणांमुळे देशातील अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली होती. २६/११ च्या हल्ल्याचे उत्तर काँग्रेस देऊ शकत नव्हती. मात्र, मोदी सरकारने पाकिस्तानला जशात तसं उत्तर दिलं आहे”, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.“मी देशातील आणि राज्यातील जनतेचे आभार मानतो, त्यांनी पंतप्रधान मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवले. तसेच मी कल्याणमधील जनतेचेही आभार मानतो, की त्यांनी मला तिसऱ्यांदा मला लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून दिले. मी एनडीए सरकारला तिसऱ्या कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो. मागच्या १० वर्षात एनडीए सरकारने जी विकासाची कामं केली आहेत, ती पुढचे पाच वर्ष सुरु राहतील, असा मला विश्वास आहे”, अशी प्रतिक्रिया श्रीकांत शिंदे यांनी दिली.पुढे बोलताना त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीकाही केली. “काँग्रेसने एकट्याने निवडणूक लढवली किंवा आघाडी म्हणून लढवली, तरी काँग्रेसला शेवटी विरोधातच बसायचं आहे. आज काँग्रेस विरोधी पक्षात आहे.

### नेमकं काय म्हणाले श्रीकांत शिंदे ?

मात्र, त्यांना सत्तेत असल्याचा सारखा आनंद होतो आहे. गेल्या १० वर्षात काँग्रेस ४४ जागांवरून केवळ ९९ जागांवर पोहोचली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला १०० च्या संख्येपर्यंतही पोहचता आलेलं नाही”, असे ते म्हणाले. “काँग्रेसने २८५ जागांवर निवडणूक लढवली. मात्र, केवळ ९९ जागांवर त्यांना विजय मिळवता आला. या निवडणुकीत काँग्रेसच्या ५१ उमेदवारांची जमानत जप्त झाली. आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश या राज्यांत काँग्रेसला खातेही उघडता आलेले नाही. त्यामुळे काँग्रेसने आता आत्मचिंतन करण्याची आवश्यता आहे”, असा टोलाही त्यांनी लगावला.“देशातील जनतेने तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनवले आहे. २०२४-२५ मध्ये ८० देशांमध्ये निवडणुका आहेत. त्यापैकी ५० देशांतील निवडणुका झाल्या आहेत. त्यातही ३४ देशांमध्ये सरकार बदलले आहे. मात्र, भारतातील जननतेने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींवर विश्वास दाखवला आहे. कारण पंतप्रधान मोदी यांनी आंतराष्ट्रीय स्तरावर भारताचं नाव उंचावलं आहे. भारत आज आत्मनिर्भरतकडे वाटचाल करतो आहे ”, असेही ते म्हणाले. तसेच “काँग्रेसच्या धोरणांमुळे देशातील अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली होती. २६/११ च्या हल्ल्याचे उत्तर काँग्रेस देऊ शकत नव्हती.

# केंद्र सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावं!

## लोकसभेतील पहिल्याच भाषणात अमोल कोल्हेंची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने लवकरात लवकर जाती आधारित जनगणना करावी तसेच इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट ) खासदार अमोल कोल्हे यांनी लोकसभेत केली आहे. तसेच त्यांनी विकासाच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारलाही लक्ष्य केलं आहे. ते आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलत होते.**

महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा आरक्षणावरून राज्यात मोठा आक्रोश आहे. दुसरीकडे ओबीसींमध्येही आरक्षणावरून चिंता आहे. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की सरकारने जाती आधारित जनगणना करावी तसेच इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावं”, असं अमोल कोल्हे म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरून केंद्र सरकारवर टीकाही केली. “राष्ट्रपतींनी त्यांच्या भाषणात सांगितलं की देशात ८० कोटी गरीब नागरिकांना मोफत धान्य दिलं जात आहे, पण आपण पाचवी मोठी अर्थव्यवस्था आहोत



हे सांगताना ही बाब अभिमानस्पद आहे का? राष्ट्रपतींनी त्यांच्या भाषणात केंद्र सरकारच्या विकासात्मक योजनांचा उल्लेख केला. मात्र, आज आपल्या देशावर किती कर्ज आहे?” असा प्रश्न अमोल कोल्हे यांनी विचारला.“राष्ट्रपतींनी त्यांच्या अभिभाषणात ग्रामीण अर्थव्यवस्थेचा उल्लेख केला. मात्र, दुर्दैवाने त्याच दिवशी केंद्र सरकारने दुध पावडर आयात करण्याचा निर्णय घेतला. आज देशात पाण्याची बॉटल २० रुपयाला मिळते. मात्र, शेतकऱ्यांना दुध विकताना २० ते २२ रुपये प्रति लीटर प्रमाणे पैसे मिळतात. हा शेतकऱ्यांना समृद्ध करण्याचा निर्णय आहे का?” असेही ते म्हणाले.महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा आरक्षणावरून राज्यात मोठा आक्रोश आहे. दुसरीकडे ओबीसींमध्येही आरक्षणावरून चिंता आहे

### केंद्र सरकारवरही केली टीका


. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की सरकारने जाती आधारित जनगणना करावी तसेच इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावं”, असं अमोल कोल्हे म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरून केंद्र सरकारवर टीकाही केली. “राष्ट्रपतींनी त्यांच्या भाषणात सांगितलं की देशात ८० कोटी गरीब नागरिकांना मोफत धान्य दिलं जात आहे, पण आपण पाचवी मोठी अर्थव्यवस्था आहोत हे सांगताना ही बाब अभिमानस्पद आहे का? राष्ट्रपतींनी त्यांच्या भाषणात केंद्र सरकारच्या विकासात्मक योजनांचा उल्लेख केला.

# 05 वर्षांचा संसार, एक मुलगा अन् चार वर्षांपूर्वी घटस्फोट

बॉलीवूडमधील सर्वोत्तम अभिनेत्रींपैकी एक म्हणजे कोंकणा सेन शर्मा होय. तिने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर छाप सोडली आहे. नुकत्याच आलेल्या 'किलर सूप' या सीरिजमधील अभिनयासाठी तिचं खूप कौतुक झालं. उत्तम दिग्दर्शिका व अभिनेत्री असलेली कोंकणा सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे.कोंकणाने २०१० मध्ये अभिनेता रणवीर शौरी याच्याशी लग्न केलं होतं. पण १० वर्षांच्या संसारानंतर ते २०२० मध्ये विभक्त झाले. या जोडप्याला एक मुलगा देखील आहे.

आता पुन्हा एकदा कोंकणाच्या आयुष्यात प्रेम आल्याचं म्हटलं जातंय. कोंकणा तिच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या अमोल पराशरला डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे.४४ वर्षी कोंकणा व ३७ वर्षीय अभिनेता अमोल पराशर एकमेकांसह डेटिंग करत असल्याच्या चर्चा होत्या. यावर कोंकणाचा पूर्वाश्रमीचा पती रणवीर शौरीने प्रतिक्रिया दिली आहे. त्याची प्रतिक्रिया व्हायरल झाल्यानंतरच कोंकणा व अमोल खरंच रिलेशनशिपमध्ये असल्याचं म्हटलं जातंय.एका एक्स अकाउंटवरून





अमोलच्या इन्स्टाग्राम स्टोरीचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. यात अमोल एका राजकीय इव्हेंटबद्दल बोलतोय. त्याचा स्क्रीनशॉट शेअर करताना लिहिलंय, 'कोंकणा सेन शर्माने मोदी भक्त रणवीर शौरी सोडून धर्मनिरपेक्ष अमोल पराशरला डेट करण्याचा

सर्वात चांगला निर्णय घेतला.' या पोस्टवर रणवीर शौरीने कमेंट केली आहे. "होय, मी पण सहमत आहे," असं रणवीरने म्हटलंय. त्याने ही कमेंट करून कोंकणा व अमोलच्या नात्यावर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा होत आहे.कोंकणा व अमोलने 'डॉली किट्टी और वो चमकते सितारे' या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. या चित्रपटानंतर अनेकदा त्यांच्या अफेअरच्या अफवा पसरल्या होत्या, पण दोघांनीही यावर कधीच प्रतिक्रिया दिली नाही. आता रणवीरच्या या कमेंटनंतर पुन्हा कोंकणा व अमोलचं नातं चर्चेत आहे.

## करिश्मा कपूरचा जबरदस्त डान्स पाहिलात का?

दिल तो पागल हैं' या १९९७ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटात शाहरुख खान, माधुरी दीक्षित व करिश्मा कपूर यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. चित्रपटाचं कथानक, गाणी अगदी सगळं काही लक्षवेधी होतं. परंतु, या सगळ्यात आजही लक्षात आहे तो म्हणजे दोन्ही प्रमुख अभिनेत्रींनी एकत्र केलेला जबरदस्त डान्स. माधुरी आणि करिश्माने प्रचंड मेहनत करून 'दिल तो पागल हैं' चित्रपटात आपल्या नृत्याची झलक दाखवली होती. 'दिल तो पागल हैं'मध्ये माधुरी दीक्षितने पूजा तर, करिश्मा कपूरने निशा हे पात्र साकारलं होतं. निशाच्या पायाला दुखापत झाल्यावर राहुल म्हणजेच शाहरुख खान पूजाला लीड डान्सर बनवतो अन् पुढे राहुल-पूजाची लव्हस्टोरी कशी फुलते या गोष्टी प्रेक्षकांना चित्रपटात पाहायला मिळतात. परंतु, यामध्ये पूजा आणि निशाची एका सीनमध्ये डान्सिंग जुगलबंदी पाहायला मिळते.

## बाबांकडे जावंस वाटतं

दिवंगत अभिनेते इरफान खान यांनी त्यांच्या विविधांगी भूमिकांमधून प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यांच्या अभिनयाच कौतुक आजही मनोरंजसृष्टीत केलं जातं. 'पान सिंग तोमर', 'अंग्रेजी मीडियम', 'लाईफ ऑफ पाय' अशा अनेक चित्रपटामध्ये त्यांनी उत्कृष्ट भूमिका साकारली. त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवत त्यांचा मुलगा बाबिल खानही सिनेसृष्टीत उतरला.अन्विता दत्त लिखित, दिग्दर्शित 'कला' या चित्रपटाद्वारे बाबिलने सिनेसृष्टीत पदार्पण केलं. बाबिल सोशल मीडियावर कायम सक्रिय असतो. अभिनयासह वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टीही तो चाहत्यांबरोबर शेअर करत असतो. परंतु, अचानक बाबिलने त्याच्या सोशल मीडियावर असं काही शेअर केलं ज्यामुळे सगळ्यांनाच धक्का बसला.२४ एप्रिलला रात्री बाबिल खानने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी शेअर केली होती. यात त्याने लिहिलं होतं की, "कधी कधी मला हार मानावीशी वाटते आणि सगळं सोडून बाबांकडे जावस वाटतं." बाबिलच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. दरम्यान बाबिलने ही पोस्ट आता डीलीट केली असली तरी त्याच्याबद्दल काळजी व्यक्त केली जात आहे.



## अभिनेत्री तमन्ना भाटिया अडचणीत

बॉलीवूड अभिनेत्री तमन्ना भाटिया अडचणीत सापडल्याचं दिसतंय. महाराष्ट्र सायबर सेलने तमन्नाला समन्स बजावलं आहे. फेअरप्ले ॲपवर आयपीएल २०२३ च्या बेकायदेशीर स्ट्रीमिंगबाबत तमन्नाला चौकशीसाठी बोलावण्यात आलंय. या स्ट्रीमिंगमुळे वायकॉमचं कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालंय. तिला २९ एप्रिल रोजी महाराष्ट्र सायबर सेलसमोर हजर राहण्यास सांगण्यात आलं आहे. तमन्ना भाटियाने फेअरप्लेचं प्रमोशन केलं होतं, त्यामुळे तिची या प्रकरणी चौकशी केली जाईल. तिला साक्षीदार म्हणून चौकशीसाठी बोलावण्यात येत आहे. फेअरप्लेच्या प्रमोशनसाठी तिच्याशी कोणी संपर्क साधला होता आणि त्यासाठी तिला किती पैसे मिळाले, यासंदर्भात तिची चौकशी केली जाणार आहे. 'एएनआय'ने याबद्दल वृत्त दिलं आहे.तमन्ना भाटियाआधी २३ एप्रिल रोजी अभिनेता संजय दत्तलाही या प्रकरणी समन्स बजावण्यात आलं आहे. पण, संजय सध्या मुंबईत नाही, त्यामुळे दिलेल्या तारखेला हजर राहू शकत नसल्याचं त्याने म्हटलं आहे. त्याने आपला जबाब नोंदवण्यासाठी तारीख आणि वेळ मागितली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, वायकॉमने महाराष्ट्र सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी तपास केला जात असून त्याचसंदर्भात तमन्ना भाटिया आणि संजय दत्त यांना चौकशीसाठी समन्स पाठवण्यात आले आहे. या प्रकरणी रॅपर बादशाहचा जबाबही नोंदवण्यात आला आहे. फेअरप्लेवर बेकायदेशीरपणे आयपीएलचं स्ट्रीमिंग केल्याने वायकॉमचं मोठं नुकसान झाल्याचं म्हटलं जातंय.



## 'जाड' म्हणणाऱ्यांना लारा दत्ताने सुनावलं

मिस युनिव्हर्स आणि अभिनेत्री लारा दत्ता सध्या तिच्या आगामी 'स्ट्रॅटेजी: बालाकोट अँड बियॉन्ड' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. लाराने तिच्या करिअरमध्ये अनेक सुपरहिट सिनेमे केले आहेत. मागच्या काही काळापासून अभिनयक्षेत्रापासून दूर असणारी लारा आता कमबॅक करत आहेत. या सीरिजच्या निमित्ताने दिलेल्या मुलाखतीत तिने घाणेरड्या कमेंट्स व ट्रोलिंगबद्दल तिचं मत मांडलं आहे. नुकत्याच 'पिंकविला'ला दिलेल्या मुलाखतीत लाराने नकारात्मक कमेंट्स व ट्रोलिंगबद्दल तिला काय वाटतं ते सांगितलं. "वैयक्तिकरित्या मी सोशल मीडियावर फारशी सक्रिय नाही. मी सोशल मीडियावर तितकीच सक्रिय आहे जितकी मला व्हायचं आहे. जर मला सतत फॉलोअर्स, लाईक्स आणि कमेंट्सची पाहिजे असतील, तर मला त्यासोबत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी तयार राहावं लागेल," असं लारा म्हणाली.लाराने फॉलोअर्स कमी असण्याबाबत म्हणाली, "माझ्या सोशल मीडिया फीडमध्ये माझ्यासाठी खास गोष्टी आहेत, या खास गोष्टी जे माझे खरे फॉलोअर्स आहेत त्यांच्यासह मला त्या शेअर करायच्या आहेत. म्हणूनच माझे फारसे फॉलोअर्स नाहीत, पण जे लोक सोशल मीडियावर खरे आहेत, ते कधीच तुम्हाला वाईट बोलणार नाहीत. मला खूप ट्रोलिंग आणि अश्लील कमेंट्ससारख्या गोष्टींना सामोरं जावं लागत नाही, असं मला वाटतं."लारा दत्ता म्हणाली, "लोकांना त्यांची मतं मांडण्याचा अधिकार आहे, ते मला म्हातारी म्हणतील, जाड म्हणतील, पण या सर्व गोष्टींमुळे माझ्या आयुष्यात काही फरक पडणार आहे का? मला माहित आहे की ट्रोलिंग करणारे काही नावं नसलेले लोक आहेत आणि ते त्यांच्या आयुष्यात काय करत आहेत हे मला माहित नाही, त्यामुळे मी कोणाबद्दलही बोलू शकत नाही."कामाबद्दल बोलायचं झाल्यास लारा लवकरच 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात दिसणार आहे.

# भारताचा आफ्रिकेवर दणदणीत विजय!

## शफाली वर्माचं द्विशतक! राणाच्या विक्रमी 10 विकेट्स

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामना आज पार पडला. चार दिवस चाललेल्या या सामन्यात टीम इंडियाने १० गडी राखून विजय मिळवला. टीम इंडियाला दुसऱ्या डावात फक्त ३७ धावांची गरज होती, जी त्याने एकही विकेट न गमावता पूर्ण केले. भारताने हे लक्ष्य १०व्या षटकातच गाठले आणि मालिका जिंकली. या सामन्यात भारतीय महिला संघाच्या फलंदाजांनी चमकदार कामगिरी केली असली तरी गोलंदाज स्नेह राणाने दाखवलेला खेळ वाखाणण्याजोगा होता. या सामन्यात तिने १० विकेट्स घेत इतिहास रचला आहे.**




सामन्याच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना स्नेह राणासमोर तग धरता आला नाही. राणाने २५.३ षटकं गोलंदाजी करताना ७७ धावांत ८ बळी घेतले. यापैकी तिने चार षटके अशा प्रकारे टाकली की एकही धाव दिली नाही. पहिल्याच डावात तिने आठ विकेट घेतल्यावर या सामन्यात ती किमान दहा विकेट्स घेऊ शकते हे जवळपास निश्चित झाले होते. दक्षिण आफ्रिकेला फॉलोऑन मिळाला, त्यामुळे त्यांना लगेचच फलंदाजीला यावे लागले.दुसऱ्या डावात स्नेह राणाने ४० षटके गोलंदाजी करताना १२ षटकं निर्धाव टाकली आणि १११ धावा दिल्या आणि दोन गडी बाद केले. यासह तिच्या १० विकेट्स पूर्ण झाल्या. दुसऱ्या डावात स्नेह राणाच्या दोन विकेट्सशिवाय दीप्ती शर्मा आणि राजेश्वरी गायकवाड यांनीही प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. पूजा वस्त्राकर, शफाली वर्मा आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली. स्नेह राणा व्यतिरिक्त झुलन गोस्वामी ही एकमेव भारतीय गोलंदाज आहे जिने एका कसोटी सामन्यात १० विकेट्स घेतल्या आहेत. सामन्याबद्दल बोलायचे झाले तर भारताने प्रथम फलंदाजी करताना ६ विकेट्सवर ६०३ धावा करून डाव घोषित केला. यामध्ये शफाली वर्माचे द्विशतक आणि स्मृती मानधनाच्या शतकी खेळीचा समावेश आहे. तर जेमिमाह रॉड्रिग्स, हरमनप्रीत कौर आणि रिचा घोष यांनी अर्धशतके झळकावली. या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ २६६ धावांवरच मर्यादित राहिला, त्यामुळे त्यांना फॉलोऑनला सामोरे जावे लागले. यानंतर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात ३७३ धावा केल्या. म्हणजेच भारताला केवळ ३७ धावांचे लक्ष्य मिळाले, जे त्याने एकही विकेट न गमावता पूर्ण केले आणि सामना दहा गडी राखून जिंकला. सामन्याच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना स्नेह राणासमोर तग धरता आला नाही.

राणाने २५.३ षटकं गोलंदाजी करताना ७७ धावांत ८ बळी घेतले. यापैकी तिने चार षटके अशा प्रकारे टाकली की एकही धाव दिली नाही. पहिल्याच डावात तिने आठ विकेट घेतल्यावर या सामन्यात ती किमान दहा विकेट्स घेऊ शकते हे जवळपास निश्चित झाले होते. दक्षिण आफ्रिकेला फॉलोऑन मिळाला, त्यामुळे त्यांना लगेचच फलंदाजीला यावे लागले.दुसऱ्या डावात स्नेह राणाने ४० षटके गोलंदाजी करताना १२ षटकं निर्धाव टाकली आणि १११ धावा दिल्या आणि दोन गडी बाद केले. यासह तिच्या १० विकेट्स पूर्ण झाल्या. दुसऱ्या डावात स्नेह राणाच्या दोन विकेट्सशिवाय दीप्ती शर्मा आणि राजेश्वरी गायकवाड यांनीही प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. पूजा वस्त्राकर, शफाली वर्मा आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली.

### दहा गडी राखून जिंकला सामना

भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामना आज पार पडला. सामन्याबद्दल बोलायचे झाले तर भारताने प्रथम फलंदाजी करताना ६ विकेट्सवर ६०३ धावा करून डाव घोषित केला. यामध्ये शफाली वर्माचे द्विशतक आणि स्मृती मानधनाच्या शतकी खेळीचा समावेश आहे. तर जेमिमाह रॉड्रिग्स, हरमनप्रीत कौर आणि रिचा घोष यांनी अर्धशतके झळकावली. या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ २६६ धावांवरच मर्यादित राहिला, त्यामुळे त्यांना फॉलोऑनला सामोरे जावे लागले. यानंतर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात ३७३ धावा केल्या. म्हणजेच भारताला केवळ ३७ धावांचे लक्ष्य मिळाले, जे त्याने एकही

# धोनीने कौतुक करताच भारावला रोहित शर्मा

## विश्वचषक जिंकून देणारा रोहित धोनीनंतरचा दुसरा कर्णधार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० वर्ल्ड कप २०२४ मध्ये टीम इंडियाच्या विजयाने एमएस धोनीला त्या स्टेजवर यायला भाग पाडले जिथून तो दूर राहणे पसंत करतो. बार्बाडोसमध्ये झालेल्या फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून टीम इंडियाने टी-२० वर्ल्ड कप जिंकताच धोनीने इन्स्टाग्रामवर त्यांचे भरभरून कौतुक केले. आता धोनीने स्तुती केली आणि रोहित त्यावर काहीच बोलला नाही असे कसे होईल?**




बार्बाडोसमध्ये टी-२० विश्वचषकाची ट्रॉफी उंचावणारा कर्णधार रोहित शर्माला धोनीने टीम इंडियासाठी काहीतरी बोलल्याचं समजताच, त्याने त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास उशीर केला नाही.बार्बाडोसमध्ये एएनआयशी बोलताना रोहित शर्माने धोनीने केलेल्या स्तुतीवर प्रतिक्रिया दिली. खरंतर, रोहितला पहिल्यांदा सांगण्यात आलं होतं की धोनीनं इंस्टाग्रामवर टीम इंडियाच्या विजेतेपदाचं कौतुक केलं होतं. यानंतर १७ वर्षांनंतर भारताला टी-२० विश्वचषक जिंकून देणाऱ्या कर्णधाराने धोनीच्या स्तुतीला प्रतिक्रिया दिली. टीम इंडियाला टी-२० विश्वचषक जिंकून देणारा रोहित धोनीनंतरचा दुसरा कर्णधार आहे.रोहित शर्माने सर्वप्रथम धोनीचे कौतुक केले. तो म्हणाला की तो एक महान खेळाडू आहे, त्याने देशासाठी खूप काही केले आहे. आता त्याने जर कौतुक केले असेल, तर ती माझ्यासाठी आणि संपूर्ण टीमसाठी खूप मोठी गोष्ट आहे.आता हे देखील जाणून घेऊया की धोनीने आपल्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये टीम इंडिया टी-२० विश्वचषक जिंकल्याबद्दल काय लिहिले होते. एमएस धोनीने इन्स्टाग्रामवर पोस्टमध्ये लिहिले की, “टीम इंडिया विश्वविजेते! फायनल पाहताना माझे हृदयाचे ठोके वाढले होते. दडपणाच्या स्थितीत शांत राहून, स्वतःच्या कौशल्यांवर विश्वास ठेऊन तुम्ही विजयश्री खेचून आणलीत. याकरता तुमचं मनापासून अभिनंदन. वर्ल्डकप पुन्हा भारतात आणल्याबद्दल समस्त भारतीयांच्या वतीने धन्यवाद आणि खूप शुभेच्छा!”

### टीम इंडियाच्या विजेतेपदाचं कौतुक

एएनआयशी बोलताना, धोनीने केलेल्या स्तुतीवर प्रतिक्रिया देण्याव्यतिरिक्त, रोहित शर्माने टीम इंडियाच्या विजयाबद्दल आणि त्याच्या प्रवासाबद्दल देखील सांगितले. तो म्हणाला की त्याने २००७ मध्ये खेळायला सुरुवात केली होती. त्याच वर्षी टीम इंडियाने आपला पहिला टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर आता दुसऱ्यांदा या ट्रॉफीवर नाव कोरल्याने तो खूप खूश आहेइंडियासाठी काहीतरी बोलल्याचं समजताच, त्याने त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास उशीर केला नाही.बार्बाडोसमध्ये एएनआयशी बोलताना रोहित शर्माने धोनीने केलेल्या स्तुतीवर प्रतिक्रिया दिली. खरंतर, रोहितला पहिल्यांदा सांगण्यात आलं होतं की धोनीनं इंस्टाग्रामवर टीम इंडियाच्या विजेतेपदाचं कौतुक केलं होतं.